# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/06/2022 (शुक्रवार)

---

## घरफोडी

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत करंजोली येथे दिनांक ०६/०६/२०२२ ते दिनांक ०८/०६/२०२२ सुमारास फिर्यादी नामे— श्रीमती सरस्वतीबाई मारोतराव मुसळे वय ७० वर्ष रा.करंजोली ही घराच्या दाराला कुलुप लावून तिचा नातु प्रफुल गणेशराव वानखडे यांचे सोबत घराच्या वास्तुकानिमीत्य पीपंळगाव राउत येथे गेली होती. तिने घराच्या गव्हाच्या ड्रॉममध्ये प्लॉस्टीक डब्यात नगदी १४,७००/— रू. व छोटया पर्स मध्ये त्याच डब्यात अदांजे ०९ ग्रॅम सोन्याची अंगठी ४६ वर्षापुर्वी बनवलेली अंदाजे ४,०००/— रू. तसेच त्याच गावात राहणारी ईंदुबाई जनार्दन धवड ही सुध्दा ०८ दिवसा अगोदरपासून बाहेरगावी असल्याने तिचे घरातील नगदी १०,०००/—रू. असा एकुण कि. २८,७००/—रू. चा मुद्देमाल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार जोशि मो. नं. ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत टेकाळी कन्हान येथे दिनांक ०७/०६/२०२२ चे २१.०० वा. ते दिनांक ०८/०६/२०२२ चे २१.०० वा. ते दिनांक ०८/०६/२०२२ चे ०९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— अनंत रंगरावजी इंगोले वय ३५ वर्ष, रा. जयहिद चौक कन्हान हे आपले गोट फार्मवर हजर होते. तेव्हा त्यांचे दोन्ही बोकड व ५ कुत्रे होते व त्यांना त्यांच्या बॉक्स मध्ये बंद करून फिर्यादी हे घरी निघुन गेले. त्या वेळेस त्या ठिकाणी कोणत्याही प्रकार चा पहारेकरी किंवा सी.सी.टी.व्ही कॅमेरा लागलेला नव्हता. दि. ०८/०६/२०२२ रोजी फिर्यादी सकाळी ०९.३० वा. दरम्यान गोट फॉर्मवर गेले असता गोटफॉर्मच्या उघळया गोठयामध्ये जावुन पाहनी केली असता त्यांच्या गोटफॉर्म मधील बॉक्स मधीलजर्मन शेफड जातीचे २ कुत्रे अंदाजे वय ५ महिने किंमत १०,०००/—रू व बोकुड कि. १५,०००/—रू. असा एकुण कि. २५,०००/—रू चा माल अज्ञात आरोपीने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार नरेश वरखडे मो नं ९६३७००५३०३ हे करीत आहे.

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. नरखेड –** दिनांक ०९/०६/२०२२ चे ०७.३० वा. चे सुमारास पो.स्टे. नरखेड हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही शौचास जाते असे म्हणुन निघून गेली बराच वेळ झाला ती परत आली नाही. तिला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. नरखेड येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री गावडे मो.क्र. ८४२४०४३१३५ हे करीत आहे.

## अवैधरीत्या धारदार व घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील आंबेडकर चौक कन्हान येथे दिनांक ०८.०६.२०२२ चे २३.२० वा. ते २३.४५ वा. सुमारास पोस्टे. कन्हान चा स्टाफ पो.स्टे. परिसरात पेट्रोलिंग करित असतांना आंबेडकर चौक कन्हान येथे असतांना त्यांना गुप्त बातमीदारा कडुन माहिती मिळाली की, नगरपरिषद कन्हान कडुन एका काळया रंगाचा शर्ट घातलेला इसम व एक चौकलेटी रंगाचा शर्ट घातलेला इसम हे दोघेही आपल्या कमरेत चाकु घालुन आंबेडकर चौक कडे जात आहे. अशा मिळालेल्या खबरे वरून आरोपी नामे– १. सोनु श्यामलाल गुप्ता, वय १९ वर्ष, रा. हिरीहर नगर कांद्री कन्हान व २. बादल श्रीकृष्ण उईके, वय २३ वर्ष, रा. रॉय नगर, कन्हान यांची झडती घेतली असता त्यांच्या कडुन कमरेतुन स्टील धाऱ्याचे दोन चाकु मिळुन आले.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलीस शिपाई विशाल शंभरकर, पोस्टे. कन्हान यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ४, २५ भारतीय हत्यार कायदा सहकलम ३४ भादवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. नमुद आरोपीतांना अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार गणेश पाल हे करीत आहेत.

## अकस्मात मृत्यू

**१) पो.स्टे. केळवद :–** अंतर्गत खुरजगांव ता.सावनेर येथे दिनांक ०६/०६/२०२२ चे १०.३० वा. दरम्यान **श्रीमती राधिकाबाई दयाराम धुर्वे (मृतक), वय ८५ वर्ष, रा. खुरजगांव ता.सावनेर** ही आपल्या घराच्या मागे तुराट्याने बांधलेल्या बाथरूम मध्ये आंघोळ करित असता बाथरूम जवळ असलेल्या चुलीची आग लागुन संपुर्ण बाथरूम ला आग लागली. त्यामुळे मृतकीची पाठ दोन्ही हात दोन्ही पाय चेहरा असा एकुण ३६ टक्के जळाल्याने उपचाराकामी मेडीकल कॉलेज नागपूर येथे नेले असता दि. ०८/०६/२०२२ चे ०५.०० वाजता मृत घोषीत केले. मेडीकल पोलीस बुथ नागपूर येथून ००/२२ ची मर्ग डायारी प्राप्त झाल्याने सदर मर्ग नोंद.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस हवालदार विकास बेलसरे मेडीकल पोलिस बुथ यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार अमर झिने मो.क्र. ८१८०९७५१२५ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर :–** अंतर्गत ८ कि. मी. अंतरावरील मौजा कळंबी येथे **शुभम विजय लोणारे(मृतक), वय २७ वर्ष, रा. कळंबी** हा दि. ३१/०५/२२ चे रात्री ०१.३० वा. सुमारास आपले राहते घरी दारू पिण्याच्या सवयीचा असुन दारूच्या नशेत विषारी औषध प्राशन केले. त्याची प्रकृती खराब झाल्याने त्यास उपचारकामी प्रथम सरकारी दवाखाना कळमेश्वर व नंतर मेयो हॉस्पीटल नागपुर येथे नेले असता दि. ३१/०५/२२ चे ०३.३० वा. आय.सी.यु.मध्ये भरती केले असता डॉक्टरांनी दि. ०७/०६/२०२२ चे ०२.४५ वा उपचार दरम्यान तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी सरतर्फे सहायक फौजदार अशोक पाठक यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रकाश उईके हे करीत आहे.

## गळफास लावून मृत्यु

**१) पो.स्टे. बोरी :—** अंतर्गत ०२ कि.मी. अंरावरील मौजा नविन वस्ती बुटीटोरी येथे फिर्यादी नामे— असलम मोहम्मद शेख वय ३२ वर्ष नवीन वस्ती जिजामाता शाळेजवळ ता.जि नागपूर याने आपली दुकान उघडली असता दुकानात फिर्यादीयाची मावशी रसीदा शेख राहत असुन फिर्यादी यांचे दुकानात येणे—जाने करतात. दिनांक ०९/०६/२०२२ चे ०७.०० ते ०७.३० वा. दरम्यान फिर्यादी हे वडीलांना चहा पिण्याकरिता बोलविण्यास गेले असता फिर्यादी हे तिसऱ्या माडयावर पायी जात असतांना फिर्यादीचे वडील **मोहम्मद रहमान शेख (मृतक), वय ६५ वर्ष रा.नविन वस्ती बोरी** पायऱ्याचे समोर असलेल्या खिडकी ला पिवळया रंगाची नायलॉन दोरी गळफास घेतल्यानंतर ते मृत अवस्थेत आढळून आले. मृतक हे ६ महिण्या पासून टिबी आजारोने ग्रस्त होते या आजाराला कंटाळून त्यांनी गळफास लावुन आत्महत्या केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. बोरी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार असलम नौरंगाबादे मो.क्र ८६६८८१६०४९ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. पारशिवनी :—** अंतर्गत ०७ कि.मी. अंरावरील मौजा इटगाव शिवार येथे दि. ०९/६/२०२२ चे ०८.३० वा. ते ०९.१० वा. **अशोक उमाजी मानवटकर (मृतक), वय ४६ वर्ष, रा. इटगाव** याने आपल्या पत्नी सोबत झगडा भांडण करून त्याने इटगाव शिवारातील आपल्या शेतात दारू पिवुन दारूच्या नशेत घरगुती कारणावरून इलेक्ट्रीक लाईन चे टावर ला दोराने गळफास घेतल्यानंतर तो मृत अवस्थेत आढळून आला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— रमा अशोक मानवटकर, वय ३६ वर्ष, रा. इटगाव यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. पारशिवनी येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार हरीष सोनभद्रे मो.क्र.९५२७६६६९२२ हे करीत आहे.

**पोउपनि श्री भारत थिटे**
**मो.क्र. ७८८८०१६९४५**
**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**